# गोपींची शिकवण

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे [मुद्दे] '✻' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


**१. साधना** १३

✻ मन निर्मळ करणे १४

✻ भाववृद्धी २३

✻ कृष्णाला अपेक्षित असे बनणे ३५

**२. अहंभाव नको** ४४

✻ सात्त्विक आणि अहंभावी व्यक्ती यांना ओळखण्याची खूण ४५

✻ अहंयुक्त विचारांमुळे होणारी हानी ४६

✻ आपल्या कृतीमध्ये अहं आड येऊ नये म्हणून प्रत्येक प्रयत्नाला श्रीकृष्णाची जोड द्यावी ! ४८

✻ दोष आणि अहं निर्मूलन केल्यास गोपीभाव निर्माण होणे अन् यासाठी प्रयत्नांत सातत्य ठेवणे आवश्यक असणे ५१

✻ आपल्या प्रत्येक कृतीचे श्रेय देवाकडे सोपवल्यास 'मी'पणा जाऊन साधकांची आध्यात्मिक उन्नती जलद होईल ! ५२

✻ अहंकारामुळे भक्ताने जरी भगवंतापासून दूर जाण्याचे ठरवले, तरी भगवंत भक्ताचा धरलेला हात सोडत नसणे ५३

**३. भक्तीमार्ग** ५७

✻ भावसत्संगाचे महत्त्व आणि करावयाच्या कृती ५८

✻ गोपीभावातील साधिकांच्या कृती ६२

✻ गोपींची तळमळ ६७

✻ श्रीकृष्णासंबंधित संभाषणाचा आनंद ७२

✻ आध्यात्मिक उन्नती ७४

**४. सध्याच्या आपत्काळात व्यष्टी साधनेसह समष्टी साधनेचे महत्त्व** ७८

४ अ. पृथ्वीवर जन्माला आलेल्या व्यक्तीचे 'व्यवहार व्यवस्थित करणे' आणि 'ईश्वरी कार्य करणे', हे दोन मार्ग असणे ७८

४ आ. जन्म-मृत्यूच्या फेऱ्यांतून सुटका करून घेण्याकरता देवासाठी बिघडा (भक्ती करा) ! ८१

४ इ. प.पू. डॉक्टरांच्या शिकवणी प्रमाणे प्रयत्न करून जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून

मुक्त व्हा ! ८२
४ ई. सर्व साधकांनी साधना करून जीवनमुक्त होणे, म्हणजे ‘सनातन संस्थे’ विषयी कृतज्ञता व्यक्त करणे ८४
४ उ. ‘कृष्णभाव’ ठेवणे, म्हणजे कृष्णाला अपेक्षित अशी व्यष्टी साधना आणि समष्टी साधना दोन्ही करणे ८६
४ ऊ. कृष्णाला भेटणे, त्याच्याशी बोलणे, त्याला भरवणे, हे सर्व व्यष्टी स्तरावरील प्रयत्न असणे; परंतु समष्टी सेवा केल्यास कृष्णभक्ती वाढून आणि त्याचे गुण अंगी येऊन त्याच्याशी एकरूप होता येणार असणे ८७
४ ए. श्रीकृष्णाच्या अनुसंधानात रहाण्यासाठी व्यष्टी साधनेसह समष्टी सेवा परिपूर्ण करून तिच्याशी एकरूप व्हा ! ८८
४ ऐ. आपत्काळ वेगाने चालू झाल्याने व्यष्टी आणि समष्टी साधना तितक्याच गतीने वाढवणे अपेक्षित असणे आणि त्यासाठी दिलेली सेवा भावपूर्ण अन् तळमळीने करून कृतीच्या स्तरावर जलद गतीने प्रयत्न करणे आवश्यक ८९
**५. हिंदूंनो, साधनेचे महत्त्व जाणा !** ९०

# मनोगत

भगवद्भक्ती हा जीवनाचा पाया आहे. भक्तीविना जीवन नीरस आहे. या भवसागरातून तरून जायचे असेल, तर भगवंताचा हात धरल्यावाचून तरणोपाय नाही. जीवनातील कोणतेही कार्य करतांना त्यात भगवंताला स्थान नसेल, तर ते आपल्याला जन्म-मृत्यूच्या फेऱ्यांत अडकवते; म्हणूनच समर्थ रामदासस्वामींनी म्हटले आहे –

सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें ।।
परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ।।
– दासबोध, दशक २०, समास ४, ओवी २६

याचा अर्थ असा की, कुठलेही कार्य किंवा चळवळ यांना भगवंताचे अधिष्ठान असल्याविना ती यशस्वी होत नाहीत.

सनातन संस्थेचे कार्य समाजाला साधना सांगणे, म्हणजे अध्यात्मप्रसार करणे हे आहे. सनातनचे साधक स्वतःसाठी साधना करतात, म्हणजे व्यष्टी साधना करतात, तसेच समाजात अध्यात्मप्रसार करणे, ही समष्टी साधनाही करतात.

नीती आणि धर्म यांच्या अभावामुळे समाजाची सध्याची खालावलेली स्थिती पहाता समाजाला केवळ साधना सांगणे पुरेसे नाही, तर समाजरचना सुसंस्कारित आणि धर्माधिष्ठित करणे आवश्यक आहे. त्यासाठी धर्माची पुनर्स्थापना करून ईश्वराधिष्ठित 'हिंदु राष्ट्राची स्थापना' करणे आवश्यक आहे. त्यामुळे सध्या सनातनचे साधक समष्टी साधनेच्या अंतर्गत हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे ध्येय ठेवून प्रयत्नरत आहेत. हे ध्येय साध्य करायचे असेल, तर या कार्यासाठी भगवंताचे अधिष्ठान हवे आणि त्याही पुढे जाऊन साधकांमध्ये भगवद्‌भक्तीचा भक्कम पाया हवा.

धर्मसंस्थापनेच्या सेवेमध्ये सनातनचे साधक जगद्‌गुरु श्रीकृष्णाला आदर्श मानतात. धर्मसंकटाच्या वेळी साधक जेव्हा आर्ततेने प्रार्थना करतात, तेव्हा 'श्रीकृष्ण धावून येतो आणि ते संकट दूर करतो', अशी त्यांना अनुभूती येते. श्रीकृष्णाने द्वापरयुगात त्याची भक्ती करणाऱ्या गोपींप्रमाणेच या कलियुगातही भक्तीचा प्रसार करण्यासाठी सनातन संस्थेला गोपी-साधिका दिल्या आहेत.

द्वापरयुगातील गोपींप्रमाणे कलियुगातील या गोपींच्याही ध्यानीमनी केवळ श्रीकृष्णच आहे. त्याच्याच प्राप्तीचा त्यांना ध्यास आहे. श्रीकृष्णाला स्मरून त्या सर्व कृती करतात. 'सर्वकाही श्रीकृष्णामुळेच होत आहे आणि तोच करत आहे', अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. या भक्तीमुळे त्यांची प्रतिभा जागृत झाली आहे. खरेतर बहुतेक गोपींचे केवळ शालेय शिक्षणच झाले आहे; पण तरीही त्या ज्ञान आणि भक्ती या दोन्ही मार्गांतील साधकांप्रमाणे स्वयंस्फूर्तीने लिखाण करू शकतात; तसेच साधकांना व्यष्टी साधनेसाठी सोप्या भाषेत मार्गदर्शनही करू शकतात.

गोपीभावातील या साधिकांनी अन्य साधकांसाठी भावसत्संग घेतले. त्यामध्ये त्यांनी साधकांना केलेले मार्गदर्शन टंकलिखित करून ठेवले आहे. साधना, अहं न्यून करणे, भाववृद्धी आणि समष्टी साधना या विषयांवर वेळोवेळी स्फुरलेले विचार त्यांनी लिहून ठेवले आहेत. हे सर्व लिखाण साधकांसाठी मार्गदर्शक असल्याने ते या ग्रंथरूपाने संकलित केले आहे. साधकांमध्ये भक्तीचा भक्कम पाया निर्माण झाल्यास ते श्रीकृष्णकृपेने ईश्वराधिष्ठित हिंदु राष्ट्राची स्थापना लीलया करू शकतात; कारण शेवटी तसे होणे, ही श्रीकृष्णाचीच इच्छा आहे आणि कार्य करवून घेणाराही तोच आहे. साधक केवळ माध्यम आहेत.

साधनामार्गावरील प्रथम टप्प्यातील जिज्ञासू आणि सर्वसाधारण लोक यांच्यासाठीही 'गोपीभावातील साधिकांची शिकवण' या ग्रंथातील लिखाण उपयुक्त आहे. या लिखाणाचा लाभ सर्वांना होवो, ही जगद्‌गुरु श्रीकृष्णचरणी प्रार्थना ! - **संकलक**